# सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष :** आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासून मुंबई येथे सुरु झालेले हिवाळी अधिवेशन आज शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या ८ असून प्रत्यक्षात ४४ तास १७ मिनिटे कामकाज झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे १० मिनिटे व अन्य कारणांमुळे ७ तास ३८ मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी ७ तास ४८ मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ५ तास ३० मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ८२८४ असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ६४९ आहे. सभागृहात १६ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या १८ असून स्वीकृत झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या शुन्य आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या २३४७ असून स्वीकृत लक्षवेधी सूचनांची संख्या १०९ इतकी आहे. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना २० आहेत.

...2/-

या अधिवेशनात विधानसभेने एकूण १८ विधेयके संमत केली व दोन्ही सभागृहांनी एकूण १४ विधेयके संमत केली.

अर्धा तास चर्चेच्या एकूण १९५ सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ८४ स्वीकृत करण्यात आल्या आणि सभागृहात ४ अर्धा तास सूचनांवर चर्चा झाली.

नियम २९३ अन्वये २ प्रस्तावावर चर्चा झाली. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली. संपूर्ण अधिवेशन कालावधीत सभागृहात माननीय सदस्यांची एकूण सरासरी उपस्थिती ८१.१७ टक्के होती. त्यात जास्तीत जास्त ९३.७७ टक्के तर कमीत कमी उपस्थिती ६८.८७ टक्के एवढी होती.

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपाध्यक्ष, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, सर्व माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी, विधिमंडळाचे अधिकारी व सर्व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे देखील मी या ठिकाणी आवर्जून आभार मानतो.

आता मी पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा व हे अधिवेशन संस्थगित करण्याबाबत माननीय राज्यपालांकडून जो संदेश आलेला आहे तो वाचून दाखवितो.

# सत्र काळातील कामकाजाचा आढावा

**अध्यक्ष :** आता मी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा घेत आहे. विधानसभेचे सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासून मुंबई येथे सुरु झालेले हिवाळी अधिवेशन आज शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी संस्थगित होत आहे.

या सभागृहाच्या बैठकांची एकूण संख्या ८ असून प्रत्यक्षात ४४ तास १७ मिनिटे कामकाज झालेले आहे. मंत्री उपस्थित नसल्यामुळे १० मिनिटे व अन्य कारणांमुळे ७ तास ३८ मिनिटे असा कामकाज होऊ न शकलेला एकूण कालावधी ७ तास ४८ मिनिटे आहे. सभागृहाचे रोजचे सरासरी कामकाज ५ तास ३० मिनिटे झालेले आहे.

एकूण प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ८२८४ असून स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांची संख्या ६४९ आहे. सभागृहात १६ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. एकूण प्राप्त झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या १८ असून स्वीकृत झालेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या शुन्य आहे.

एकूण प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांची संख्या २३४७ असून स्वीकृत लक्षवेधी सूचनांची संख्या १०९ इतकी आहे. तर चर्चा झालेल्या लक्षवेधी सूचना २० आहेत.

...2/-